## ज्योतिषविषयक
सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी
**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770


सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५७ वा | बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ओबीसी आरक्षणामुळे जि. प. अध्यक्षपदासाठी सोलापूरात जोरदार रस्सीखेच

**सोलापूर (सचिन जाधव):-** सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्षपद यंदा ओबीसी खुला प्रवगार्साठी आरक्षित झाल्याने जिल्ह्याच्या राजकारणात चांगलीच खळबळ उडाली असून, अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी तीव्र रस्सीखेच सुरू झाली आहे. जिल्ह्यातील 17 गट ओबीसीसाठी आरक्षित झाल्यामुळे या गटांमधून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी उमेदवारी आपल्यालाच मिळावी यासाठी राजकीय गॉडफादरकडे जोरदार फिल्डींग लावल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी 21 जानेवारी ही अंतिम तारीख असून, अवघे दोनच दिवस शिल्लक राहिल्याने अनेक इच्छुक उमेदवारांनी प्रमुख नेत्यांच्या बंगल्यांवर आणि कार्यालयांमध्ये तळ ठोकला आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी भेटीगाठी, शिफारसी आणि राजकीय समीकरणे यांचा धडाका सुरू आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेत एकूण 68 गट असून, त्यापैकी 17 गट ओबीसी प्रवगार्साठी राखीव आहेत. यामध्ये 8 गट महिलांसाठी, तर 9 गट ओबीसी खुला प्रवगार्साठी आरक्षित करण्यात आले आहेत. सन 2017 मध्येही जिल्हा परिषदेत 68 गट होते. त्यानंतर अकलूज व अनगर हे जिल्हा परिषद गट नगरपरिषद व नगरपंचायतीत रूपांतरित झाल्याने दोन गट कमी झाले होते. मात्र



नव्याने झालेल्या गट रचनेत पुन्हा 68 गटांची संख्या कायम ठेवण्यात आली आहे.

दरम्यान, यंदाच्या निवडणुकीत भाजप आक्रमक भूमिकेत असून, समविचारी नेत्यांनाही कमळ या अधिकृत चिन्हावरच निवडणूक लढविण्यासाठी आग्रही असल्याची चर्चा आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर भाजपाने आता जिल्हा परिषदेतही शंभर टक्के ताकद लावण्याचा निर्धार केला आहे. 68 पैकी 35 हा बहुमताचा मॅजिक फिगर गाठण्याचे उद्दिष्ट पक्षाने ठेवले आहे. 2017 मध्ये भाजपाच्या चिन्हावर 14 सदस्य निवडून आले होते. यंदा ही संख्या दुप्पट करण्याचा निर्धार भाजपाने केला आहे.

भाजपाच्या ताकदीत यंदा लक्षणीय वाढ झाल्याचे मानले जात आहे. माजी आमदार राजन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य रणजितसिंह शिंदे, माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख आणि माजी आमदार दिलीप माने यांच्या भाजप प्रवेशामुळे पक्ष अधिक मजबूत झाल्याचे चित्र आहे.

**अक्कलकोट, दक्षिण सोलापूरकडून अध्यक्षपदाचा दावा**

जिल्हा परिषद स्थापनेपासून आजपर्यंत अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या तालुक्यांना अध्यक्षपदाची संधी मिळालेली नाही. विशेष म्हणजे मागील तीन-चार वर्षांपासून जिल्ह्याच्या राजकारणात अक्कलकोट तालुका केंद्रस्थानी राहिला आहे. त्यामुळे यंदा सत्ताधारी कोणताही पक्ष असो, या दोन्ही तालुक्यांतून ओबीसी प्रवगार्तील उमेदवार निवडून आल्यास अध्यक्षपदासाठी जोरदार दावा केला जाण्याची शक्यता राजकीय वतुर्ळात व्यक्त होत आहे.

**ओबीसीतून अध्यक्षपद भूषविलेले माजी अध्यक्ष (कार्यकाळ)**

ओबीसी आरक्षणातून आतापर्यंत खालील नेत्यांना जिल्हा परिषद अध्यक्षपदाची संधी मिळाली आहे -

बाबुराव जाधव (21 मार्च 1997 ते 20 मार्च 1998), नारायण खंडागळे (21 मार्च 2002 ते 17 फेब्रुवारी 2005), वैशाली सातपुते (18 फेब्रुवारी 2005 ते 20 मार्च 2007), डॉ. निशिगंधा माळी-कोल्हे (21 मार्च 2012 ते 20 सप्टेंबर 2014) एकूणच ओबीसी आरक्षणामुळे जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवडणूक यंदा अत्यंत चुरशीची होणार असून, पुढील काही दिवसांत राजकीय हालचालींना अधिक वेग येण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# विमल खताळ, उमेश पाटील, सचिन जाधव, चरणराज चवरे, नितीन निळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## मोहोळ तालुक्यातील राजकारणाला आला वेग







**कुरूल (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या आजच्या पाचव्या दिवशी विविध राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यामध्ये कामती जि. प. गटातून विमलताई खताळ, कुरुल जि. प. गटातून उमेश पाटील, सचिन जाधव, पेनुर जि.प. गटातून चरणराज चवरे, पोखरापूर जि. प. गटातून सजेर्राव निळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून मोहोळ तालुक्यातील राजकारणाला वेग आला आहे.

मोहोळ तालुक्यातील ६ जिल्हा परिषद गट व १२ पंचायत समिती गणांची निवडणूक लागली असून मंगळवारी जिल्हा परिषद गटासाठी १७ उमेदवारांनी तर पंचायत समिती गणासाठी २८ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. मंगळवार पर्यंत एकूण जिल्हा परिषदेसाठी २९ तर पंचायत समितीसाठी ३३ अर्ज असे एकूण ६२ अर्ज दाखल झाले होते. आमदार राजू खरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी कुरुल जि. प.गटातून, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांनी पेनुर जि.प.गटातून त्याचबरोबर पोखरापूर जि. प. गटातून नितीन निळे यांनी शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी ज्येष्ठ नेते पद्माकर देशमुख, मोहोळच्या नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे, नगरसेवक रमेश बारसकर आदींसह शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.तसेच कुरुल गटातून जकराया साखर कारखान्याचे अध्यक्ष सचिन जाधव यांनी भाजपामधून कार्यकर्त्यांसह वाजत गाजत शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केला. यावेळी जालिंदर लांडे, राहुल जाधव, माऊली जाधव आदी उपस्थित होते. आष्टी जिल्हा परिषद गटातून भाजपाकडून समाधान शेळके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

पोखरापूर जिल्हा परिषद गट बालाजी नरुटे भाजप सर्जेराव निळे, नाना निळे (शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस), देविदास शेंडगे उद्धव ठाकरे (शिवसेना), नरखेड गट लक्ष्मण मगर (काँग्रेस), कुरुल गट अंकुश जगताप, हनुमंत पाटील (भाजपा), आष्टी गट राजेंद्र सर्जे (काँग्रेस), अजय डोंगरे (शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस), समाधान शेळके, बाळासो पाटील (भाजपा), लालासाहेब पाटील (अपक्ष) तसेच पोखरापूर पंचायत समिती गणासाठी समाधान खंदारे (शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस), अतुल मोरे (काँग्रेस) बाबासाहेब गाडे, आदिनाथ कांबळे (भाजपा), सय्यद वरवडे प. स. गणातुन राहुल मोरे (भाजपा), बाळासाहेब गायकवाड, विजय कोकाटे, संग्राम काकडे (शरद पवार रा. काँ.), सुरेश शिवपूजे (काँग्रेस), चांगुना म्हाळनोर (राष्ट्रीय समाज पक्ष)शिरापूर सो. प.स.गणातून नीलम मसलकर (भाजपा) सायली चव्हाण (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष), टाकळी सिकंदर गणातून सुवर्णा सोनटक्के स्वाती गवळी (शिवसेना) अमोरीका कापसे (भाजपा), पेनुर गणातून संगीता वसेकर शिवसेना वषार्राणी वसेकर, अंजली आढेगावकर (भाजपा), घोडेश्वर गणातून संजय विभुते (राष्ट्रवादी काँग्रेस), सुलेमान तांबोळी (काँग्रेस) पांडुरंग सरवळे हनुमंत पाटील (भाजप) पृथ्वीराज पवार महेश जाधव (शरदचंद्र पवार रा. काँ.)खंडाळी प.स. गणातून सतीश भोसले, अजित भोसले (भाजपा) आष्टी गणातून जयराम गुंड (भाजपा) आदींनी उमेदवारी दाखल केली.

# सोलापूरहून इंदौरला बुधवारपासून विमानसेवा

## मुंबईला जाणारे विमान हेच पुढे इंदौरला जाणार!




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुंबई, गोव्यानंतर आता इंदौरला विमानसेवा सुरू होणार आहे. पहिले उड्डाण बुधवारी (ता. २३) होणार आहे. मुंबईला जाणारे विमान हेच पुढे इंदौरला जाणार आहे. ही वनस्टॉप विमानसेवा राहणार असून, सोलापुरातून मोठा प्रतिसाद मिळण्याचा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे.

मुंबईला जाणारे विमानच पुढे इंदौरला पोचणार आहे. हे विमान दुपारी ३ वाजता सोलापुरातून उड्डाण घेऊन मुंबई स्टॉप घेत पुढे इंदौरला सायंकाळी ५.३० वाजता पोचणार आहे. इंदौर मोठी बाजारपेठ असून, ती या विमानसेवेमुळे सोलापूरशी जोडली जाणार आहे. शिवाय उज्जैन येथे महाकाल दर्शनाची सोय होणार आहे.

इंदौर हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थळ असून, त्या ठिकाणीही जाण्याची सुविधा मिळणार आहे. तिकीटदर ४९०० रुपये असून, याचा सोलापूरसह शेजारील जिल्ह्यातील व्यापारी, कारखानदार व व्यावसायिकांना लाभ होणार आहे. इंदौरहून सोलापूरसाठी विमानसेवेची वेळ दिली नाही, पण तिथून मुंबईसाठी विमानसेवा असणार आहे.

# सोलापूरात कृषी तंत्रज्ञान महोत्सव २२ व २३ जानेवारीला

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शबरी कृषी प्रतिष्ठान, सोलापूर संचलित कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर यावर्षी १८ व्या भव्य कृषी तंत्रज्ञान महोत्सव-२०२६ चे आयोजन दि. २२ व २३ जानेवारी २०२६ रोजी कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर (सोलापूर-बार्शी रोड) येथे करण्यात आले आहे, अशी माहिती वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सवाचे उद्घाटन २२ जानेवारी रोजी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी व विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गावसाने यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असून अध्यक्षस्थानी शबरी



कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप गायकवाड राहणार आहेत. २३ जानेवारी रोजी समारोप समारंभात राष्ट्रीय व राज्यस्तरीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे तर विशेष उपस्थिती म्हणून विभागीय कृषी संशोधन केंद्र सोलापूरचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीनकुमार रणशूर, भारतीय भरडधान्य संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. बसवराज रायगोंड, नाबार्ड सोलापूरचे जिल्हा उप व्यवस्थापक नितीन शेळके आदी मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. दररोज सकाळी १० ते ११ या वेळेत भव्य शिवारफेरीचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाअंतर्गत केंद्राच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पौष्टिक भरडधान्यांमध्ये भगर, राळा, वरई, ज्वारी, हुरड्याची व लाह्याची ज्वारी, तृणधान्यांमध्ये गहू, मका, स्वीटकॉर्न, कडधान्यांमध्ये हरभरा, तर तेलबिया पिकांमध्ये जवस, तीळ व करडई यांचा समावेश आहे. भाजीपाला पिकांमध्ये टोमॅटो, मिरची, कलिंगड, खरबूज, वांगी, कोथिंबीर, पालक, मेथी, शेवगा, कोबी, बीट व गाजर आदी पिकांचे सुधारित व संकरीत वाण पाहण्याची संधी मिळणार आहे. तसेच झेंडू, डाळिंब व विविध चारा पिकांचे प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली आहेत. एकूण ३६ पिकांतील ५४ वाण व २७ आधुनिक शिफारशींवर आधारित भव्य प्रात्यक्षिके या महोत्सवाचे वैशिष्ट्य ठरणार आहे.

प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर कृषी शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत विविध कृषी निविष्ठांच्या वापराचे तुलनात्मक परिणाम प्रत्यक्ष पाहता येणार असून, क्यू.आर. कोड आधारित माहिती फलक व व्हिडीओद्वारे अद्ययावत तंत्रज्ञान माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जीजाई नॅनो किचन गार्डन, जैविक व नैसर्गिक शेती निविष्ठा, बीज प्रक्रिया युनिट, निंबोळी पावडर प्रकल्प, ट्रायकोडर्मा व मेटा-हायझियम उत्पादन, गांडूळखत तसेच ज्वारी, डाळिंब व सोयाबीन प्रक्रियायुक्त पदार्थांचे प्रदर्शन होणार आहे.शेतकरी, युवक व कृषी विस्तार कार्यकर्त्यांसाठी हा महोत्सव अत्यंत लाभदायक ठरणार असून, या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस प्रदीप गोंजारी आदी उपस्थित होते.

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# प्रणिती शिंदेंवर टीका करताना पालकमंत्र्यांचे वादग्रस्त विधान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील २९ महापालिका निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे भाजप नेते पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा विश्वास कमालीचा वाढला आहे. सोलापूर महापालिकेतही भाजपला चांगले यश मिळाले आहे.

यानंतर आता काँग्रेसच्या खासदाराने केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना भाजप मंत्र्यांची जीभ घसरली असून, त्यामुळे राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केलेल्या टीकेचा समाचार



घेताना भाजप मंत्री जयकुमार गोरे यांची जीभ घसरली आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणात याचे तीव्र पडसाद पाहायला मिळत आहे. आगामी सोलापूर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये यावरून राजकारण आणखी तापण्याची शक्यता आहे.

महापालिका पराभवानंतर खासदार प्रणिती शिंदे यांनी एक भावनिक पत्र लिहिले होते. या पत्रात त्यांनी 'झुकना हमारी फितरत नहीं। दो कदम पीछे हटे हैं.. पर सिर्फ अगली छलांग लगाने' अशी टीका केली होती. या विधानावर जयकुमार गोरे यांनी टीका करताना 'दो कदम पिछे नही हटे....50 कदम निचे गिरे है वह भी टांग उपर' या भाषेत टीका केली आहे. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर राजकारण चांगलेच तापले असल्याचे चित्र आहे. (पान 2 वर..)

# स्वर अलंकार म्युझिक अकॅडमीच्या वतीने आज पहिले संगीतमय स्नेहमिलन




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुंबई येथील नामांकित स्वर अलंकार म्युझिक अकॅडमीच्या वतीने सोलापुरात प्रथमच संगीतमय स्नेहमिलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम बुधवार, दि. 21 जानेवारी 2026 रोजी डफरीन चौक येथील आयएमए हॉल येथे संपन्न होणार आहे, अशी माहिती अकॅडमीचे प्रतिनिधी श्रीकांत कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्वर अलंकार म्युझिक अकॅडमी ही हौशी व नवोदित गायकांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी संस्था असून, सोलापूर शहरातील अनेक गायकांना गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण तसेच सादरीकरणाची संधी दिली जात आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गायकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांना संगीत क्षेत्रात पुढे जाण्यास प्रेरणा मिळत असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

हे संगीतमय स्नेहमिलन केवळ आमंत्रितांसाठी आयोजित करण्यात आले असून, यामध्ये विविध हिंदी चित्रपट गीतांचे सादरीकरण होणार आहे. कार्यक्रमात सुनील मदान, श्रीकांत कुलकर्णी, अरविंद देशमुख, डॉ. पाटणकर आणि डॉ. श्रद्धा रोडगे हे गायक सहभागी होऊन आपली गायन कला सादर करणार आहेत. विशेष म्हणजे, श्रीकांत कुलकर्णी हे ज्येष्ठ गायक मुकेश यांच्या अजरामर गीतांचे सादरीकरण करणार असून, संगीतप्रेमींना त्याची विशेष उत्सुकता आहे.

यावेळी बोलताना आयोजकांनी सांगितले की, गायनाची आवड असलेल्या इच्छुक गायकांनी या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी सुनील मदान (कुकरेजा स्पोर्ट्स) यांच्याशी संपर्क साधावा. भविष्यात अशा आणखी संगीतविषयक उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सोलापुरातील संगीतप्रेमींसाठी हा कार्यक्रम एक आगळा-वेगळा अनुभव ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस सुनील मदान, अरविंद देशमुख यांच्यासह अकॅडमीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय

# नवी दिशा

भारत आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री यांच्यात मंगळवारी चर्चा झाली. चर्चा सकारात्मक झाल्याचे नेहमीप्रमाणेच सांगण्यात आले. अमेरिकेनेही तिकडे निवेदन जारी केले. आर्थिक सहकार्य मजबूत करण्याबाबत दोन्ही देशांचे समान हितसंबंध असल्याचे अमेरिका म्हणते.

गेल्याच आठवड्यात त्यांचे नवनियुक्त राजदूत सर्जिओ गोर यांनीही भारताप्रति अमेरिकेचे विशेष ममत्व असल्याचा दावा केला.

व्यापार करारावर दोन्ही देशांची सक्रिय चर्चा सुरू असल्याचे ते म्हणाले. आठ महिने ही चर्चा सुरू आहे. सगळेच सकारात्मक आहे तर त्यातून काही निष्पन्न का होत नाही, हे अमेरिकेलाच माहिती. अमेरिकेने भारतावर 25 टक्के कर लावला आहे. रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून अतिरिक्त 25 टक्के दंडही त्यांनी भारताला ठोठावला आहे. अमेरिकेत एक विधेयकही मांडले आहे.

त्या विधेयकातील प्रमुख आणि एकमेव मुद्दा भारत आणि चीन यांना इशारा देणारा आहे. जे देश रशियाकडून तेल खरेदी करतील त्यांना 500 टक्के कर लावण्याची तरतूद या विधेयकात आहे. चीन अमेरिकेला भीक घालत नाही. भारत अमेरिकेच्या विरोधात काही बोलत नाही. चीन अमेरिकेला घाबरत नसल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. भारत घाबरत असल्यामुळे दुर्लक्ष करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील मैत्री भारतात जगप्रसिद्ध आहे.

त्या मैत्रीचा लाभ झालेला नाही, उलट या असलेल्या-नसलेल्या किंवा भासवलेल्या मैत्रीचाच ट्रम्प यांना राग आला की काय असे मानावे अशी स्थिती आहे. कारण, काहीही असो एकट्या अमेरिकेच्या भरवशावर विसंबून राहता येणार नाही हेही तेवढेच खरे. ही केवळ भारतीयांची भावना नाही तर जगात सगळीकडे साधारणतः अशीच स्थिती आहे.

फ्रान्सच्या मॅक्रॉन यांच्यापासून जर्मनीच्या शोल्झ यांच्यापर्यंत युरोपातील सगळे नेते ट्रम्प यांच्या लहरी स्वभावाबाबत सावध भूमिका घेताना दिसतात. ट्रम्प यांची रात्री किंवा सकाळी केलेली एखादी पोस्ट त्यांचा आणि अमेरिकेचा व्यापार अथवा अन्य व्यावसायिक संबंध धोक्यात आणू शकतात अशी युरोपातल्या नेत्यांना भीती वाटते. नाटोलाही त्याचा हादरा बसू शकतो, असे त्यांना भय आहे. नाटोचे अस्तित्व माझ्यामुळेच असल्याचे म्हणून ट्रम्प यांनी त्यांची ही भीती आणखी घट्ट केली आहे. ब्रिटनचे स्टार्मर किंवा ऑस्ट्रेलियाचे अल्बानीज यांची वेगळी स्थिती नाही. भारताप्रमाणेच यांचेही अमेरिकेसोबत व्यावहारिक हित गुंतले आहेत.

तथापि, पूर्णपणे हुकूमशाही वृत्तीकडे झुकलेले ट्रम्प विविध जागतिक मंचांवर सगळ्यांचीच खिल्ली उडवताना दिसतात. मूलतः त्यांचे कोणतेही विधान किंवा भूमिका ही साबणामुळे निर्माण झालेल्या बुडबुड्यासारखी असते. बुडबुडा जेवढ्या लवकर तयार होतो, तेवढ्याच लवकर फुटतोही. ट्रम्प तसेच करतात. ग्रीनलँडवरून डेन्मार्कला धमकावणे, मेक्सिकोला दमात घेणे, व्हेनेझुएलावर अप्रत्यक्ष कब्जा करणे आणि आता इराणमधील अराजकाला उघड उघड मानवाधिकार आणि लोकशाहीचे घोंगडे पांघरून खतपाणी घालण्याचा प्रयत्न करणे.

या सगळ्या बाबी एकच स्पष्ट करतात की अमेरिका किंवा अमेरिकेत जोपर्यंत ट्रम्प आहेत तोपर्यंत त्या देशाकडून कोणत्याही अपेक्षा न केलेल्या बऱ्या. भारत-अमेरिका संबंधांना नवी दिशा मिळणार असल्याचे त्यांचे परराष्ट्र मंत्री मार्को रूबिओ म्हणतात. पण व्यापार कराराचे घोंगडे त्यांनी ज्या प्रकारे भिजत ठेवले आहे त्यावरून त्यांची नियत चांगली नाही हेही उघड होते.

करार व्हायचाच असता तर जून अथवा जुलैमध्येच झाला असता. तो केला नाही आणि भारतावर दबाव टाकण्याचा जो प्रयत्न ट्रम्प सातत्याने करत आहेत त्यास त्यांची अनाकलनीय बुद्धीच कारणीभूत आहे. अर्थात, जे झाले अथवा होतेय त्याकडे सकारात्मकतेनेच पाहायला हवे. यावर भारतासह जगभरातील तज्ज्ञांचे ट्रम्प यांच्या अनुषंगाने एकमत झाले आहे, त्यातूनच नवी दिशा मिळणार आहे. अमेरिकेचा बाजार बंद होण्याचा धोका दिसल्यानंतरच भारताने अन्यत्र हातपाय मारायला सुरुवात केली.

तोपर्यंत आपण केवळ इव्हेंटबाजीतच गुंतलो होतो. ट्रम्प यांनी हा अहंकार दाखवला नसता तर ब्रिटनसोबतचा आपला व्यापार करार मार्गी लागला नसता. तो करार झालाच, त्यासोबत युरोपियन मुक्त व्यापार संघटनेसोबतही म्हणजे ईएफटीएसोबतही करार झाला. युरोपीय संघासोबतची बोलणी प्रगतीपथावर आहे. आरसीईपी म्हणजे क्षेत्रीय व्यापार भागीदारीतील जवळपास प्रत्येक देश भारतासोबत व्यापारासाठी अनुकूल झाला आहे. चीनच्या संदर्भात गलवान आणि अन्य मुद्दे आहेत.

मात्र, मागच्या काही आठवड्यांतील घडामोडींवरून वाद बाजूला ठेवत व्यापाराच्या मुद्द्यावर कोंडी फुटताना दिसते आहे जे सकारात्मक लक्षण आहे. अमेरिकेने पाकिस्तानच्या पंतप्रधानांना आणि लष्करप्रमुखांना चुचकारण्याचे सत्र अवलंबले आहे. साधारण दशकभर व्हाइट हाउसची दारे पाकिस्तानसाठी बंद होती ती ट्रम्प यांनी खुली केली. तो भारतावर दबावाचाच एक भाग आहे. या सगळ्या विषम स्थितीत भारताने पर्यायी बाजारपेठा शोधण्याच्या प्रयत्नांना जी गती दिली ती अंतिमतः लाभदायीच ठरेल.

बहुतेक वेळा असे होते की आपण एकच गोष्ट कवटाळून बसतो आणि आपल्याला ती सोडावी लागली तर आपले कसे होईल असे भय सतावत असते. ते भय तत्कालीक असते. कारण, त्या पलीकडची संधी आपण पाहिली नसते. ट्रम्प यांच्यामुळे अमेरिकेच्या संदर्भात असेच भय भारताला होते आणि अजूनही आहे. मात्र त्या पलीकडे पाहण्याची तयारी आता सुरू झाल्याचे दिसते. ट्रम्प यांनी ज्या व्यापार धोरणाचा शस्त्र म्हणून वापर केला तेच शस्त्र सहाय्यभूत ठरेल. त्यामुळे अमेरिकेपलीकडचे जग पाहण्याचा प्रयत्न तरी होईल.

# दारूच्या व्यसनाने माणूस माणसातून उठतो...

हल्ली पृथ्वीतलावर दारुड्या माणसांची संख्या प्रचंड वाढली आहे. लहान मुलांपासून ते वयोवृद्ध आजोबांपर्यंत बहुतांश लोक दारू पिताना दिसत आहेत. जगात भारत हा असा एकमेव देश आहे की, त्या देशात सर्वाधिक दारुड्यांची संख्या जास्त आहे. विशेष करून तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. भारतात ९० टक्के लोक दारू पिऊन स्वतःची सामाजिक प्रतिष्ठा कमी करून घेतात. यात निम्म्यापेक्षा जास्त तरुणांचा सहभाग आहे. काही लोक चोरून दारू पितात तर काही लोक गाडी ओव्हर फ्लो झाली तरी दारू पिऊन दारूच्या दुकानासमोर किंवा रस्त्याच्या कडेला लोळताना दिसतात. प्रत्येक माणूस आपापल्या ऐपतीनुसार वेगवेगळ्या प्रकारची दारू पितो. गोरगरीब व सामान्य जनता कमी किंमतीची भिंगरी संत्रा पिऊन फुल नशेत असतात. तर श्रीमंत माणसे भारी किंमतीची दारू पिऊन आपल्याच गुंगीत असतात, भारी किमतीची दारू माणसाला एकदम चढत नाही आणि माणसाला शक्यतो लोळवत नाही, म्हणून भारी किंमतीची दारू पिल्यावर माणसे न पिलेल्या अवस्थेत दिसतात. दारू स्वस्त असो या महागडी पण ती शेवटी दारूच असते. दारूच्या व्यसनाने माणूस माणसातून उठतो आणि पुस्तकांच्या वाचनाने माणूस माणसात येतो. म्हणून आजकाल माणसांनी दारूच्या व्यसनाच्या विखारी विळख्यातून बाहेर पडले पाहिजे. दारूच्या नशेपेक्षा पुस्तकांचे व्यसन माणसाला अधिक प्रभावी व सक्षम बनवते. दारूच्या व्यसनाने माणसाला समाजात कोणताच मानपान मिळत नसतो, समाजातील व गावातील लोक त्यांना साधा नमस्कार देखील घालायला तयार नसतात. निर्व्यसनी लोक दारुड्या लोकांच्या सावलीला देखील थांबत नाहीत. आपल्या देशात दारूचे वाढते प्रमाण पाहून भविष्यात आपल्या देशाचे खूप मोठे नुकसान होणार आहे. दारूच्या व्यसनाने माणूस विनाशाकडे वाटचाल करत असतो. आपल्या देशाची खरी ताकद हे आजकालचे युवक आहेत. जेवढे युवक बलशाली असतील तेवढी देशाची ताकद अधिक असते. परंतु उद्याचे भवितव्य समजली जाणारी युवा पिढी व्यसनाच्या

विखारी विळख्यात अडकून स्वतःची जीवनयात्रा संपवून टाकत आहे. दारूच्या व्यसनामुळे दारुड्या माणसाच्या घरात कधीच सुख शांती लाभत नाही. दारुड्या माणसाच्या घरात नेहमी भांडण तंटे व कलह सुरू असतात. दारुड्या व्यक्तीच्या रोजच्या त्रासाला कंटाळून त्याची पत्नी आपल्या माहेरी जाऊन आई-वडिलांकडे राहते. दारुड्या व्यक्तीच्या बायका आपल्या पतीला सोडचिठ्ठी देऊन मोकळ्या होत आहेत. दारुड्या व्यक्तीला समाजात थोडीही प्रतिष्ठा नसते. त्यांना अडीअडचणीला कोणी आर्थिक मदत देखील करायला तयार नसतो. दारुड्या व्यक्तीचे घर उध्वस्त होऊन बायको मुले रस्त्यावर येत आहेत. दारुड्या व्यक्तीचे जीवन म्हणजे एक प्रकारचे नरक होय. एका दारुड्या व्यक्तीमुळे सर्व परिवार उध्वस्त होत असतो. म्हणून माणसाने दारूपासून चार हात लांब राहून पुस्तकांचे वाचन सुरू केले पाहिजे. पुस्तकांच्या वाचनाने माणूस माणसात येत असतो आणि दारूच्या व्यसनाने माणूस माणसातून उठत असतो. म्हणून आपण माणसातून उठणारे व्यसन करण्यापेक्षा माणसात येणारे व्यसन करणे काळाची गरज आहे. ते व्यसन म्हणजे पुस्तकांचे वाचन होय. माणसाने चांगले व्यसन आत्मसात केले तर माणसाचे जीवन घडायला वेळ लागत नाही. सर्वात चांगले व्यसन म्हणजे पुस्तकांचे वाचन होय. रोज माणसाने पुस्तकाचे किमान 30 तरी पाने वाचलीच पाहिजेत. तुम्ही एकदा पुस्तकांच्या वाचनाच्या आहारी गेलात की, मग मात्र तुम्हाला पुस्तकाशिवाय एक मिनिट देखील राहू वाटत नाही. म्हणजे तुम्हाला नेहमी पुस्तकांचा सहवास आवडायला लागतो. पुस्तकांच्या व्यसनाने माणसाच्या बुद्धीच्या कक्षा रुंदावतात. माणसाच्या बुद्धीला चालना मिळते व माणसाची बुद्धी प्रगल्भ बनते. माणसाला चांगल्या व वाईटांची जाणीव होते. माणसाचे ज्ञान वाढते व माणूस सकारात्मक विचार करायला लागतो आणि मनात नकारार्थी विचारांना थारा देत नाही. या जगात मोठे व्हायचे असेल, चार शहाण्या लोकांत बसायचे असेल, समाजात स्वाभिमानाने जगायचे असेल आणि लोकांचा मानपान घ्यायचा असेल तर सर्वात पहिल्यांदा आपल्याला दारूच्या व्यसनाला मुठमाती देऊन पुस्तकांच्या व्यसनाच्या आहारी जाऊन दररोज पुस्तकांचे वाचन केलेच पाहिजे. म्हणूनच कोणीतरी म्हटले आहे की, वाचाल तर वाचाल नाहीतर कायमचे मरून जाचाल..ज्ञान सम्राट व बुद्धी सम्राट डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अठरा-अठरा तास पुस्तकांचे वाचन करून आपल्या बुद्धीची भूक भागवून या देशातील नवे तर जगातील सगळ्यात बुद्धिमान प्राणी व सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखले जातात. ज्या ज्या व्यक्तींनी पुस्तकांचे वाचन सुरू केले आहे, त्या त्या व्यक्ती आपल्या स्वतःच्या पायावर उभ्या राहून आपले जीवन आनंदाने जगत आहेत. पुस्तकांच्या वाचनाशिवाय माणसाला तरणोपाय नाही. पुस्तकेच माणसाचे मस्तक घडवतात आणि घडवलेले मस्तक कोणापुढेही नतमस्तक होऊ देत नाहीत, म्हणून नेहमी आपल्या मस्तकाला पुस्तकात घालून किमान रोज तीस तरी पाने वाचलीच पाहिजेत. कारण दारूपेक्षा पुस्तकांचे व्यसन माणसाला मोठे केल्याशिवाय राहत नाही. आणि दारूचे व्यसन माणसाला माणसातून उठवल्याशिवाय राहत नाही. आता तुम्हीच ठरवा की तुम्हाला दारूचे व्यसन करायचे आहे की, पुस्तकांचे व्यसन करायचे ? या प्रश्नाचे उत्तर तुम्ही स्वतःला विचारा..आणि त्याप्रमाणे तुमच्या जीवनाची वाटचाल करा...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

# पुर्व जन्म आणि पुनर्जन्म मानणारे लोकच अस्तिक असतात- आचार्य सुरिश्वरजी महाराज

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माणसाने आपले नित्य कर्म चांगले करावे जेणेकरून त्याला सद्गती प्राप्त होईल आणि जो पुर्व जन्म आणि पुनर्जन्म होऊ शकतो याला मान्यता देतो तोच अस्तिक असतो असे मत त्यांनी व्यक्त केले.



कारंबा टोळ नाक्याजवळ असलेल्या सुप्रसिद्ध अहिंसा गो शाळेला त्यांनी भेट दिला होता. त्यांच्यासोबत चार आचार्य 26 जैन श्रमण आणि 19 साध्वी यांच्यासह त्यांनी गोशाळेत आगमन केला. ज्यामध्ये सोलापूरचे रत्न आज पासून 31 वषार्पूर्वी सीए चा अभ्यास करून दीक्षा घेतलेले श्री रत्न यश विजयजी महाराज यांचाही आज आगमन झालेलं होतं.

या सर्वांचे अहिंसा गोशाळेचे सर्व डायरेक्टर्स यांनी स्वागत केलं व्याख्यानाला सोलापुरातील प्रथित यश व्यापारी मित्रपरिवार आणि नागरिक बहुसंख्या प्रमाणात उपस्थित होते.

सर्वप्रथम सोलापूरचे श्री रत्न्यास प्रवर श्री रत्न यश विजयजी महाराज यांनी आपल्या प्रवचनात म्हणाले की खूप सुंदर दिसणारे हे संसार वास्तवामध्ये खूप भयावह असते ते सुंदर करण्यासाठी आपण नामस्मरण करण्याची गरज असून एक दिवस शरीर नष्ट होणार आहे संपत्ती भरपूर गोळा करून काहीही उपयोग होत नाही तेव्हा धमार्ची आराधना करून दान धर्म करण्यावर भर द्यावा असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रबुद्ध आचार्य यांनी म्हटले की आम्ही काही दिवसच सोलापुरात आहोत. तुमच्याबरोबर वातार्लाप करायला आलेलो आहे. तेव्हा तुम्ही पुर्व जन्म पुनर्जन्मावर विश्वास ठेवत असेल तर तुम्ही आपले कर्म चांगले व्यतीत करा आणि त्याचे फळ चांगले भोकता येईल याची काळजी घ्या असे त्यांनी आपल्या प्रवचनातून आलेल्या भक्तांना समजावून सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता उत्तम चौधरी, चेतन संघवी, किरीट शहा, स्वप्नील मुनोत, योगेश मेहता, विशाल चोरलिया, विनित शहा, धीरज संघवी, विकास मखाना, राजेश झाबक, दिलीप संकलेचा, नवरतन संकलेचा, अभय सेठिया, नितीन वेद यांनी प्रयत्न केले.

# यशाच्या आनंदात मर्यादा ठेवा : आ. सुभाष देशमुख

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका निवडणुकीतील यश हे कोण्या एका व्यक्तीचे नसून सामुदायिक आहे. हे यश सोलापुरात झालेल्या विकासाचे असून काळ सर्वांना योग्य उत्तर देईल. त्यामुळे यश मिळाल्यानंतर उन्माद करू नये, तर ते पचवायला शिकावे, असे परखड मत आ. सुभाष देशमुख यांनी सोमवारी व्यक्त केले.

महापालिका निवडणुकीतील यशाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागांत लागलेल्या अभिनंदन फलकांवर भाष्य करताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. शहरात अनेक ठिकाणी 'व्यक्ती हरली, पार्टी जिंकली' अशा आशयाचे फलक लागले आहेत. यासंदर्भात बोलताना आ. देशमुख म्हणाले की, 'क्या खाना, तो दम खाना'- या सर्व घडामोडींवर कार्यकर्त्यांची बारकाईने नजर आहे.

ते पुढे म्हणाले की, बाहेरून आलेल्या सुमारे २८ जणांना नगरसेवकपद मिळाले असून, अशा नव्याने आलेल्या नगरसेवकांसाठी अभ्यास वर्ग घेण्याची गरज आहे. आहे त्या अवस्थेत उमेदवारांना पक्षात सामावून घ्या आणि त्यांच्यावर पक्षाचे संस्कार करा, असे पक्षाच्या वरिष्ठांचे स्पष्ट आदेश आहेत.

त्यामुळे नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांसाठी संस्कार व प्रशिक्षण वर्ग घेणे आवश्यक असून, पक्षाची विचारधारा आणि शिस्त त्यांच्यावर बिंबवली पाहिजे, असे मतही आमदार सुभाष देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले.

# शिक्षक पात्रता परीक्षेच्या गुण पडताळणीसाठी २१ जानेवारीपर्यंत आक्षेप नोंदविता येणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२५ चा अंतरिम निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. निकालाच्या अनुषंगाने गुण पडताळणी करावयाची असल्यास अथवा त्रुटी/आक्षेप असल्यास http://mahatet.in या संकेतस्थळावर २१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत उमेदवार/ परीक्षार्थींना लॉगिन करुन ऑनलाईन पद्धतीने आक्षेप नोंदविता येईल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे. अन्य मार्गाने आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची संबंधित सर्व उमेदवार परीक्षार्थींनी नोंद घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# सोलापुरातील चार तालुक्यांतील जागांवरून नेत्यांमध्ये संघर्ष

## करमाळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसशी तर सांगोल्यात शिवसेनेशी युतीची चर्चा!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी शक्य तेथे युती करणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले. दरम्यान, पक्षांतर्गत जागांवरून दक्षिण - उत्तर सोलापूर व मंगळवेढा - पंढरपूर तालुक्यांतील जागांवरून नेत्यांत ताणाताणी वाढल्याने संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे.

करमाळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसशी तर सांगोल्यात शिवसेनेशी युतीची चर्चा सुरू आहे.

सोमवारी (ता. १९) पालकमंत्री गोरे यांनी दिवसभरात तालुकानिहाय नेत्यांच्या बैठका घेऊन जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीबाबत चर्चा केली. त्यानंतर शक्य तेथे युती करून लढणार असल्याचे स्पष्ट केले. मात्र दरम्यान, झालेल्या बैठकांत दक्षिण व उत्तर सोलापुरातील जागांवरून आमदार सुभाष देशमुख व माजी आमदार दिलीप माने तर मंगळवेढा - पंढरपुरातील जागांवरून आमदार समाधान आवताडे व माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यात ताणाताणी झाल्याने संघर्ष निर्माण झाला आहे. या चारही तालुक्यांतील जागांबाबत रात्री उशिरापर्यंत चर्चा सुरू होती.

भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, चेतनसिंह केदार - सावंत, सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे हे आमदार, राजन पाटील, दिलीप माने, प्रशांत परिचारक, संजयमामा शिंदे, राजेंद्र राऊत, यशवंत माने,



शहाजी पाटील हे माजी आमदार यांच्यासह रणजितसिंह शिंदे, प्रा. रामदास झोळ आदींनी पालकमंत्री गोरे यांची भेट घेऊन चर्चा केली.

**जिल्हा परिषदेत पूर्ण बहुमताचा संकल्प**

शक्य असेल त्या ठिकाणी मित्र पक्षासोबत महायुती करण्याचा भारतीय जनता पक्षाचा मानस आहे. महापालिका निवडणूक भारतीय जनता पक्ष मित्र पक्षासोबत महायुती करण्यास तयार होता. मात्र काहींच्या अहंकारामुळे महायुती झाली नाही. त्या कारणाने एमआयएम सारखा पक्ष दुसऱ्या क्रमांकावर आला. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत ज्या तालुक्यात शक्य आहे. त्या ठिकाणी मित्रपक्षासोबत महायुती करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेत पूर्ण बहुमताचा संकल्प केला आहे. अक्कलकोट तालुक्यात कोणाशीही युती होणार नाही. मात्र, करमाळ्यात राष्ट्रवादीशी युतीची चर्चा सुरू आहे. त्याबाबत मंगळवारी निर्णय होईल. नगरपालिका, महापालिका निवडणुकीतील यशानंतर अनेकजण भाजपसोबत येण्यास तयार आहेत, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

**जमिनीवरचा नेता, ते १५ फूट खाली**

दोन फूट मागे नाही तर ते १५ फूट खाली गेल्याचा टोला काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांना लगावला. खासदार शिंदे यांनी लिहिलेल्या जाहीर पत्राबाबत विचारलेल्या प्रश्नावर ते बोलत होते. मी जमिनीवरील नेता आहे, त्या दिल्लीत बसून सोलापूरचे राजकारण करतात, असेही त्यांनी म्हटले.

**हत्तूरमधून अलगोंडा पाटील**

दक्षिण सोलापूरमधील हत्तुर मतदारसंघातून काँग्रेसच्या जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य इंदुमती अलगोंडा पाटील यांना उमेदवारी देण्याच्या हालचाली सुरू आहेत. या ठिकाणाहून भाजपकडून उज्ज्वला हविनाळे यांच्यासह अनेकजण इच्छुक आहेत.

# राजमाता जिजाऊ



१२ जानेवारी १५९८ रोजी
महाराष्ट्रात सिंदखेड नगरी
जन्मले कन्यारत्न शूरवीर
जिजाऊ साहेब जाधवांच्या घरी

इसवी सन १६०५ सा. शुभदिनी
बनल्या शहाजी राज्यांच्या अर्धांगिनी
झुंझार नेतृत्व, रणरागिणी
छत्रपती शिवरायांच्या जननी

महाराष्ट्र भूमी थोर भाग्याची
मिळाल्या शूर वीर माऊली
बनवून शिवरायांना पराक्रमी
स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली

कारभार जहागिरीचा अफाट
आले पेच प्रसंग पदोपदी तरी
नाही डगमगला आपण, दाखवून वाट
पाहिले स्वप्न स्वराज्याचे सोनेरी

टाकला उधळून मुघलांचा डाव
केले रक्षण रयतेचे हरघडी
नाही ठेवला मनी भेदभाव
बसवली स्वराज्याची घडी

सुवर्णमयी युग घडविण्यास
विनंती आऊ साहेब आपणास
यावे आपण पुन्हा जन्मास
प्रार्थना हीच परमेश्वरास

**साधना जगदाळे घाटगे**
मोहोळ

पान १ वरून

# प्रणिती शिंदेंवर टीका करताना...

अब की बार सोलापूर जिल्हा परिषदेवर भाजप सरकार असा नारा दिला आहे. जयकुमार गोरे यांनी प्रणिती शिंदे यांच्यावर केलेल्या आक्षेपार्ह टीकेमुळे काँग्रेस नेते आक्रमक होण्याची शक्यता आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी भाजपकडून जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर बैठकांचा सिलसिला सुरू झाला आहे. महापालिका निवडणुकीप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही भाजप यश मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

## वात्रटिका

### सत्तेची भूक

न बाप राहिला पोराचा
न पोरगा राहिला बापाचा...
खेळ एवढा रंगला की आता
भरोसा नाही कोणाचा...
तिथे पोहचले जे कोणी
त्यांनाच माहित तिथले सुख...
म्हणून वाट्टेल त्या मार्गाने
भागवली जाते सत्तेची भूक...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाचे केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसमोर सादरीकरण

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली राज्य शासनाची भूमिका

**नवी दिल्ली, (कटू वृत्त सेवा):-** महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पुढाकार घेत ह्यराज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणह्व स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन यासंदभार्तील प्रस्तावाचे सादरीकरण केले. या प्राधिकरणास मंजुरी मिळाल्यास ते देशातील पहिले प्राधिकरण ठरणार असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

या विशेष बैठकीत मंत्री मुंडे यांनी राज्यातील जल आणि पर्यावरण प्रकल्पांच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली. नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या मदतीसोबतच राज्याची स्वतःची एक स्वतंत्र यंत्रणा आणि नियोजन असणे काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. देशातील अनेक नद्या विविध राज्यांतून प्रवाहित होतात. जर प्रत्येक राज्याने आपल्या भौगोलिक सीमेतील नदीपात्राच्या स्वच्छतेसाठी आणि पुनरुज्जीवनासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी व सुनियोजित योजनांची अंमलबजावणी केली, तर नद्यांचे पूर्णतः प्रदूषणमुक्त करण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल असे मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले. या प्रक्रियेमुळे भविष्यात नद्यांचे पावित्र्य आणि त्यांची नैसर्गिक प्राकृतिकता टिकवून ठेवण्यात देशाला मोठे यश मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रस्तावावर केंद्रीय मंत्री पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्राने याबाबत घेतलेल्या पुढाकाराबद्दल विशेष कौतुक केले आणि यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस राष्ट्रीय नदी संरक्षण संचलनालयाचे (एनआरसीडी) संचालक राजेश कुमार, महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांसह केंद्र व राज्यातील इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No .MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# प्रभाग ६ मधील नगरसेवकांकडून आमदार आणि नेत्यांविषयी कृतज्ञता, मानले आभार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक ६ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी घवघवीत यश संपादन केले. पॅनल प्रमुख गणेश वानकर यांच्या नेतृत्वाखाली सुनील खटके, मृण्मयी गवळी आणि सोनाली गायकवाड यांनी विरोधकांना चारीमुंड्या चीत केले. भाजपच्या या चारही उमेदवारांच्या विजयात महत्त्वपूर्ण असे योगदान दिल्याबद्दल पॅनल प्रमुख गणेश वानकर, सुनील खटके, मृण्मयी गवळी आणि सोनाली गायकवाड यांनी

दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे आणि माजी आमदार व सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप माने व पाणी वेस तालीमचे संस्थापक चंद्रकांत वानकर यांना भेटून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष मनिष देशमुख, नगरसेवक प्रथमेश कोठे,दत्तात्रय वानकर, विठ्ठल वानकर, महादेव गवळी, हेमंत पिंगळे, अर्जुन गायकवाड, भीमा गायकवाड, समर्थ वानकर, विजय वानकर, जीवन माने आदी उपस्थित होते.

सोलापूर महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीची सत्ता आली आहे.

सोलापूर शहराच्या विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून लढवलेल्या निवडणुकीत भाजपाने एकहाती सत्ता मिळवली आहे. निवडणुकीच्या कालावधीत प्रचारादरम्यान जनतेला विकास कामासंदर्भात दिलेले अभिवचन पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पार्टी कटिबद्ध असल्याचे नवीन नूतन नगरसेवकांना शुभेच्छा देताना आमदार सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे आणि माजी आमदार दिलीप माने यांनी सांगितले.

भारतीय जनता पार्टीने केलेली कामे जनतेपर्यंत पोहोचवून घराघरात भारतीय जनता पार्टीचे विचार पोहोचविणार असल्याचे पॅनल प्रमुख नगरसेवक गणेश वानकर यांनी सांगितले.

यावेळी आमदार महोदय यांनी भाजपच्या सर्व नगरसेवकांना भावी वाटचालीस शुभेच्छा देताना प्रभागाच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे अभिवचन दिले.

# जेलरोड पोलिसांची कारवाई; तडीपार आरोपींकडून चोरीचे १११ मोबाईल जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील जेलरोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने प्रभावी कारवाई करत तडीपार आरोपींकडून चोरी केलेले एकूण १११ मोबाईल जप्त केले असून त्यांची एकूण किंमत १३ लाख ५२ हजार ९९८ रुपये इतकी आहे.

जानेवारी २०२६ मध्ये जेलरोड पोलीस ठाण्यात मोबाईल चोरीचे चार गुन्हे दाखल झाले होते. पोलीस उपआयुक्त विजय कबाडे व सहाय्यक पोलीस आयुक्त प्रताप पोमण यांच्या आदेशानुसार तपास सुरू असताना १७ जानेवारी २०२६ रोजी गुप्त बातमीच्या आधारे इक्बाल मैदान परिसरात सापळा रचून फारुक महमद हनिफ पठाण (वय ४२, रा. शहापूर चाळ, सोलापूर) यास



ताब्यात घेण्यात आले. चौकशीत तडीपार आरोपी गणेश उर्फ आप्पा बैरुणगी व लखन बैरुणगी यांनी विविध ठिकाणाहून मोबाईल चोरी करून विक्रीसाठी दिल्याची कबुली दिली. या कारवाईमुळे जेलरोड पोलीस ठाण्यातील चार गुन्हे उघडकीस आले असून ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली आहे.

# तडवळे सेवा केंद्रात हळदी कुंकू कार्यक्रम साजरा



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** धाराशिव तालुक्यातील तडवळे सेवा केंद्रात महिलांनी हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित केला होता. अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या स्व स्वरूप संप्रदाय तडवळा सेवा केंद्रात महिलांनी हळदी कुंकू कार्यक्रम साजरा केला.या मध्ये गावातील महिलांना मानाचे हळदी कुंकू लावून पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली परंपरा गत पान सुपारी, तिळ गुळ,लुटण्याचे समान देऊन आनंद लुटून घेतला.या कार्यक्रमास अध्यक्षा दिपाली भांड, महिला अध्यक्षा वर्षा कदम, सोनाली कोरडे, सुवर्णा होगले, पूजा गायकवाड, राज्यश्री गुळवे, विद्या कोरडे, श्वेता नाडे, नीता डोलारे, यांनी कार्यक्रम पार पाडला.कार्यक्रम झाल्यावर महिलांनी चहा,सेल्फी चा चांगलाच आनंद लुटला. या वेळी गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जि. प. गटासाठी 94 तर पं. स. गणासाठी 113 अर्ज विक्री

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी मंगळवेढा तालुक्यामध्ये जोरदार प्रतिसाद असल्याचे दिसून येत आहे. 207 इतके नामनिर्देशन पत्र घेतले गेले असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधव यांनी दिली.

मंगळवेढा तालुक्यातील 4 जिल्हा परिषद व 8 पंचायती समितीच्या जागेवर होणाऱ्या निवडणुकीसाठी तालुक्यातून मोठा प्रतिसाद असल्याचे दिसून येत आहे. सध्या कोणत्याही



पक्षाने अथवा कोणत्याही आघाडीने आपले पत्ते ओपन केले नसल्याने संभाव्य नावे चर्चेत आहेत. याबाबत अधिकृत दुजोरा कोणत्याही गटाने दिला नाही. मंगळवेढा तालुक्यामध्ये भालके परिचारक व आ. आवताडे यांची राजकीय ताकद मोठी आहे. या तीन गटातच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी निवडणूक लढवणारे इच्छुक जास्त असल्याचे दिसून येत आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना या पक्षांना बैठका घेऊन पुढे कोणतीही दिशा सापडत नसल्याने सध्या त्यांनी आपले समर्थक भालके, परिचारक, आ. आवताडे यांच्या गटात निवडणुकीला उभे राहतील का? याबाबतची चाचपणी करत आहेत. सध्या चेअरमन शिवानंद पाटील यांनी दामाजी नगर जिल्हा परिषद गटासाठी लढावे, अशी त्या भागातील लोकांनी मागणी केली. मात्र त्यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीत संधी द्यायची, या भूमिकेने निवडणूक लढवणार नाही. हा निर्णय घेतल्याचे दिसून आले.

दरम्यान, बुधवारी शेवटचा दिवस असल्याने अनेक नामनिर्देशन पत्रे दाखल होतील, अशी शक्यता आहे. संत दामाजी नगर ओबीसी पुरुष, हुलजंती सर्वसाधारण महिला प्रवर्ग, भोसे खुला प्रवर्ग तर लक्ष्मी दहिवडी जिल्हा परिषद गट अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. अनेक जिल्हा परिषद गटात बाहेरच्या गटातील उमेदवारांची संभाव्य नावे चर्चेत आल्याने त्या गटातील लोकांकडून मोठ्या प्रमाणावर नाराजी व रोष व्यक्त केला जात आहे. त्यामुळे भालके, परिचारक व आवताडे गटाला याबाबत विचार करावा लागणार आहे. मंगळवेढ्यात शहरातील सकल मराठा समाजाच्यावतीने घेण्यात आलेल्या बैठकीत खुल्या प्रवर्गात सर्वसाधारण जागेवर जे आरक्षण आहे. त्या आरक्षणाच्या विचारानेच उमेदवार द्यावेत, असा बैठकीत सूर उमटल्याचे सांगण्यात आले.

# शासकीय रेखा कला परीक्षेत विशेष नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** शासकीय रेखा कला परीक्षेत विशेष नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कलाशिक्षक संघाच्या वतीने सन्मान चिन्ह व पाचशे रुपये रोख रक्कम देऊन प्रतिवर्षी कै. इंडिकर सर माजी कलाशिक्षक यांच्या स्मरणार्थ देऊन सन्मानित करण्यात येते.

2025 साठी सदर पुरस्काराचे मानकरी सोलापूर मधून एकूण तीन विद्यार्थी आहेत. पैकी एलिमेंटरी ग्रेड परीक्षेसाठी धायफुले आर्णा नागेश (83 वा), आहेरकर ईशान राजेश (93 वा) आणि इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेसाठी कोरे तन्मय बसवराज (77 वा) यांना सन्मानित करण्यात आले.

सदर कार्यक्रम इंडियन मॉडेल स्कूल सांस्कृतिक भवन मध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे इंडियन मॉडेल स्कूलचे सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी व मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी मॅडम, राज्य सहसचिव शांतप्पा काळे, जिल्हाध्यक्ष शशिकांत सदाफुले, सचिव संतोष धारेराव यांच्या उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी सर्व प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांची प्रशंसा केली व कलाविषयाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. संघटनेचे सचिव संतोष धारेराव यांनी आपल्या मनोगतात संघटनेचे कार्य व त्याची वाटचाल यावर सविस्तर विशद केले.

या कार्यक्रमात प्रशालेचे कलाशिक्षक अनिल रॉय, शैलेश कुलकर्णी, निलेश शिरसागर, राधिका देवणपल्ली व संघटनेतील सर्व पदाधिकारी, सदस्य व कलाप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेच्या शिक्षिका दिपाली इंगळे यांनी केले.

# आचारसंहिता कालावधीमध्ये सर्व स्तरावरील लोकशाही दिन रद्द

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सामान्य प्रशासन विभागाचे 26 सप्टेंबर 2012 च्या परिपत्रकानुसार तालुका, जिल्हा/महानगरपालिका, विभागीय, मंत्रालय स्तरावरील लोकशाही दिन अंमलबजावणीबाबत एकत्रित आदेश दिलेले आहेत. परिपत्रकातील कलम 5.7 नुसार लोकशाही दिन केव्हा होणार नाही याबाबत दिलेल्या स्पष्टीकरणामध्ये ज्या ज्या क्षेत्रांमध्ये निवडणूकीकरीता आचारसंहिता लागू करण्यात आली आहे, अशा ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येवू नये अशा सूचना दिलेल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात दरमहा महिन्याचे पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. परंतु दि.13 जानेवारी 2026 पासून सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीची आचारसंहिता लागू झालेली असल्याने जिल्हास्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन उक्त नमूद परिपत्रकानुसार करता येणार नाही. तसेच दि. 02 फेब्रुवारी, 2026 रोजी होणारा जिल्हा लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त अभियानासाठी शिक्षण मंडळ सज्ज




**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी आणि मार्च २०२६ दरम्यान उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) आणि माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) लेखी परीक्षा आयोजित करण्यात आल्या आहेत. या परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळ सज्ज असल्याचे मंडळाच्या मुंबई विभागीय सचिवांनी कळविले आहे.

इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षांमध्ये कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळामार्फत सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक यांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करण्यात आले आहेत. परीक्षेकरिता दक्षता समिती गठीत करण्यात आली असून भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा कशी द्यावी तसेच परीक्षा देताना काय करावे आणि काय करू नये, याबाबतही सूचना देण्यात आल्या असल्याचे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# रस्ते अपघातातील जखमींसाठी दिलासा; कॅशलेस उपचार व 'राहवीर' ला बक्षीस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रस्ते अपघातात जखमी झालेल्या नागरिकांना आता तातडीचा आणि मोफत वैद्यकीय उपचार मिळणार आहे. केंद्र सरकारच्या कॅशलेस वैद्यकीय उपचार योजने अंतर्गत अपघातग्रस्तांना सात दिवसांसाठी दीड लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार दिले जाणार आहेत. तसेच, जखमींना तात्काळ रुग्णालयात पोहोचवणाऱ्या मदतनीसाला (ह्यराहवीरह्न) सरकारकडून २५ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. ही योजना लवकरच राष्ट्रीय स्तरावर लागू करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तीन टप्प्यांची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. अपघातानंतर जखमींना तात्काळ केंद्र सरकारने मान्य केलेल्या रुग्णालयात दाखल करणे आवश्यक आहे. त्यानंतर २४ तासांच्या आत पोलिसांना अपघाताची सविस्तर माहिती व जखमींची प्रकृती



कळवावी लागेल.

तिसऱ्या टप्प्यात जखमींची वैद्यकीय फाइल तयार केली जाईल, ज्यामध्ये पोलिस अहवाल आणि ओळखपत्र सादर करावे लागेल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अपघाताच्या दिवसापासून पुढील सात दिवसांसाठी दीड लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचार मिळणार आहेत.

योजनेअंतर्गत रुग्णालयात दाखल करताना कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. प्राथमिक उपचार पूर्णपणे मोफत असतील. गंभीर जखमींसाठी शस्त्रक्रिया, एक्स-रे, सीटी स्कॅन, एमआरआयसह सर्व तपासण्या आणि औषधे मोफत देण्यात येणार आहेत.

दरम्यान, अपघात व मृत्यूंची संख्या कमी करण्यासाठी मोटार वाहन कायद्यात ६१ दुरुस्त्या करण्यात आल्या असून, प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आलेल्या योजना यशस्वी ठरल्यामुळे 'कॅशलेस उपचार' व 'राहवीर' उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सोलापूर ग्रामीण पोलिस दलाच्या वाहतूक शाखेकडून वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यात येत असून, मानवी चुका व नियमांचे उल्लंघन यामुळे अपघातांची संख्या वाढत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.


'वाहतूक नियमांचे पालन केल्यास सुमारे ७० टक्के अपघात टाळता येऊ शकतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करावी, तसेच ग्रामस्थांनी बैठका घेऊन सुरक्षित वाहनचालना बाबत मार्गदर्शन करावे,'असे आवाहन बाळासाहेब भरणे, पोलिस निरीक्षक (ग्रामीण), सोलापूर यांनी केले आहे.

# अक्कलकोटमध्ये उघड्या कचऱ्यामुळे आरोग्याला धोका; दुकानदारावर गुन्हा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट शहरातील हन्नूर पूल बाह्यवळणावर उघड्यावर कोंबड्यांचे मांस, दुकानातील मैला कचरा व अवशेष टाकून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण केल्याप्रकरणी टेंपो चालक व मालकाविरोधात अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगरपरिषद अक्कलकोट येथील आरोग्य निरीक्षक नितीन सुरेश शेंडगे (वय ३२) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यानुसार शुक्रवार, १६ जानेवारी रोजी सकाळी सुमारे ११ वाजता हा प्रकार उघडकीस आला. हन्नूर पूलाच्या बाह्यवळणावर रस्त्याच्या कडेला हैदर पालांडे हा कोंबड्यांच्या मांसाचे तुकडे व कचरा टेंपो (आरटीओ क्र. एम.एच. १३/डी.क्यू. ७३८८) मधून उघड्यावर टाकताना आढळून आला. चौकशीत हा कचरा अक्कलकोट शहरातील दुकानातून गोळा करून त्याच टेंपोमधून वाहतूक करून हजूर रोडलगत उघड्यावर टाकल्याचे निष्पन्न झाले. या प्रकारामुळे परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी संबंधित दुकानदार व टेंपो मालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून पुढील तपास अक्कलकोट उत्तर पोलिस करत आहेत.

**CHANGE IN NAME**
I am changing my name from **PADMASHREE SURYAKANT SHETE** to **PADMASHRI SURYAKANT SHETE** for passport issuance.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 157

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# जिल्हा परिषद निवडणुकीत घराणेशाहीला थारा नको : आ. सुभाष देशमुख

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत घराणेशाहीला थारा देऊ नये, असे स्पष्ट मत आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले आहे. भाजपच्या कोणत्याही नेत्याने आपल्या मुलाला पुढे करू नये, तर पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी देऊन त्यांना पुढे आणावे, असे आवाहन त्यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान केले.

सोमवारी दुपारी सुमारे बारा वाजता आमदार विजयकुमार देशमुख यांनी आमदार सुभाष देशमुख यांची विकासनगर येथील कार्यालयात भेट घेतली. या भेटीदरम्यान दोघांमध्ये बराच वेळ विविध विषयांवर चर्चा झाली. या चर्चेनंतर जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर



आमदार सुभाष देशमुख यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सध्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती सुरू असून, आपण या प्रक्रियेत कुठेही सहभागी नसल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाच्या मंडल अध्यक्ष, तालुकाध्यक्ष तसेच जिल्हाध्यक्ष यांच्या माध्यमातून इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आपण स्वतः मुलाखतीसाठी का गेलो नाहीत, असा प्रश्न विचारला असता आमदार देशमुख म्हणाले की, माजी आमदार दिलीप माने हे कदाचित मुलाखतीसाठी गेले असतील. या वक्तव्यातून त्यांनी अप्रत्यक्ष टोला लगावत आपली भूमिका ठामपणे मांडली.

जिल्हा परिषद निवडणुकीत कार्यकर्त्यांना संधी मिळावी आणि घराणेशाहीला आळा बसावा, यासाठीच आपण ही भूमिका घेतल्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी स्पष्ट केले.

# निर्णयांमुळे नाराजी झाली; पण सर्व काही पक्षहितासाठीच : पालकमंत्री जयकुमार गोरे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका निवडणुकीच्या काळात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्या निर्णयांमुळे अनेकांनी माझ्यावर राग काढला, काहींनी उघडपणे वादही घातले. काहींना पक्षात घेतल्याने नाराजी व्यक्त झाली. मात्र, ते सर्व मोठ्या मनाने स्वीकारून पुढे गेलो. काही वेळा चिडलो, बोललो आणि भांडलोही; पण हे सर्व केवळ पक्षहितासाठीच होते, अशी स्पष्ट कबुली ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

सोलापूर महापालिका निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित भाजप नगरसेवकांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांचा सत्कार करण्यात आला.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, महापालिका निवडणुकीदरम्यान काही निर्णय सर्वांनाच आवडले नाहीत. त्यामुळे माझ्यावर टीका झाली. मात्र, प्रत्येक निर्णयाची माहिती मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांना वेळोवेळी दिली जात होती. अनेक वेळा मतभेद झाले, वादही झाले; पण त्यातूनच सोलापुरात पक्षाला मोठा विजय मिळाला, असे त्यांनी सांगितले.

### त्या प्रभागाला १० कोटी रुपयांचा निधी जाहीर

प्रचारादरम्यान सर्वाधिक मताधिक्य मिळवणाऱ्या प्रभागाला १० कोटी रुपये विकासकामांसाठी देण्याचे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले होते. त्या शब्दाची पूर्तता करत त्यांनी सत्कार कार्यक्रमात प्रभाग क्रमांक १२ मधील नगरसेवकांसाठी १० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला. हा निधी दहा दिवसांत उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### गौरवोद्गार, मात्र विजयकुमार देशमुख अनुपस्थित

या कार्यक्रमात पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आमदार विजयकुमार देशमुख व आमदार सुभाष देशमुख यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करत गौरवोद्गार काढले. मात्र, कार्यक्रमाला आमदार विजयकुमार देशमुख यांची अनुपस्थिती दिसून आली. त्यांच्या अनुपस्थितीची चर्चा कार्यक्रमस्थळी उपस्थितांमध्ये रंगली होती.

### नगरसेवकांना वरिष्ठांचा कानमंत्र

कार्यक्रमात पक्षाच्या वरिष्ठांनी नवनिर्वाचित नगरसेवकांना काही स्पष्ट सूचना दिल्या. नगरसेवकपद हे लोकांची सेवा करण्यासाठी आहे, वैयक्तिक स्वार्थासाठी नाही. पक्षाला डाग लागेल, असे कोणतेही कृत्य करू नये. शहरातील नागरिकांची कामे प्राधान्याने करावीत, लोकांना वेळ द्यावा. समाजात वावरताना अवास्तव वक्तव्य टाळावे व इतर पक्षांविषयी प्रतिक्रिया देऊ नयेत. वागण्या-बोलण्यामुळे पक्षाची बदनामी होणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच मतदार व निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देऊन जनतेची कामे प्रामाणिकपणे करावीत, असा कानमंत्र यावेळी देण्यात आला.

# काका साठे यांचा बीबीदारफळ गटातून अर्ज दाखल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकीत उत्तर सोलापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते काका साठे हे पुन्हा एकदा निवडणुकीला सामोरे जात आहेत.

आपला पारंपारिक नान्नज जिल्हा परिषद गट सोडून ते आता पहिल्यांदाच बीबीदारफळ या जिल्हा परिषद गटातून उभे राहत आहेत.

अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मंगळवारी काका साठे यांनी बीबी दारफळ या जिल्हा परिषद गटातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी कोणताही गाजावाजा त्यांनी केला नाही.

सोबत सुवर्णा झाडे, माजी उपसभापती जितेंद्र शीलवंत, माजी तालुकाध्यक्ष प्रल्हाद काशीद, अन्नू मार्तंडे, प्रकाश चोरेकर, कुमार नवगिरे, दीपक अंधारे, सुभाष शिंदे, लिंबाजी लामकाने, बापू शिंदे, प्रकाश गुरव, मोहन लांबतुरे यांची उपस्थिती होती.

जिल्हा परिषद नान्नज गटासाठी अनिल माळी यांनी अर्ज दाखल केला आहे. वडाळा पंचायत समितीसाठी वैशाली शीलवंत, मार्डी अनुसूचित जाती गणासाठी काजल संजय गायकवाड जगताप अंबिका लामकाने बीबीदारफळ पंचायत समिती गणासाठी यांनी अर्ज दाखल केले आहे.

# सौ. मल्लम्मा चप्पळगाव 'सावित्री- फातिमा गुणवंत शिक्षक पुरस्काराने' सन्मानित

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व त्यांना खंबीरपणे साथ देऊन त्यांच्या या 'महन्मय' कार्यात शिक्षकाची भुमिका निभावून खुप मोठे योगदान देणाऱ्या देशातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका म्हणून गणल्या जाणाऱ्या फातिमा शेख यांच्या संयुक्त नांवाने दिला जाणारा व शिक्षणाच्या हक्कासाठी, शिक्षकांच्या सन्मानासाठी " हे ध्येय ठेवून महाराष्ट्र स्तरावर कार्य करणाऱ्या शिक्षक भारती या संघटनेच्या सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने दिला जाणारा यंदाचा जिल्हास्तरीय पुरस्कार हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेच्या कार्यकुशल सहशिक्षिका व सांस्कृतिक कार्यक्रम विभाग सहाय्यिका सौ. मल्लम्मा चप्पळगाव यांना " सावित्री- फातिमा गुणवंत शिक्षक पुरस्काराने " सन्मानित करण्यात आले. फेटा, शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र " असे या पुरस्काराचे स्वरूप होते. जुळे सोलापूर येथील " जगदीशश्री लॉन्स अॅन्ड हॉल



"मध्ये पार पडलेल्या सन्मान सोहळ्यात राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, माजी शिक्षक आमदार कपिल पाटील, संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजित काटमोरे यांच्या हस्ते सौ.मल्लम्मा चप्पळगाव यांना गौरवण्यात आले. यावेळी या सोहळ्यासाठी महाराष्ट्र राज्य व वेगवेगळ्या जिल्हा,तालुका स्तरावर शिक्षक भारती संघटनेचे कार्य करणारे अनेक पदाधिकारी, प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक साखरे, जेष्ठ शिक्षक सरदार मत्तेखाने, अप्पासाहेब काळे,शहाजी माने व समस्त शिक्षक बंधू- भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी, पती काशीनाथ चप्पळगाव उपस्थित होते.आपल्या प्रशालेतील सकारात्मक दृष्टीकोन बाळगून हिरीरीने काम करणाऱ्या एका सहशिक्षेकेला हा बहुमान प्राप्त झाल्याने महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे अध्यक्ष व कार्यसम्राट आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी,संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मा.श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी,हन्नूर प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सी. ई.ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी अभिनंदन केले.

# भाजपच्या इंद्रजीत पवारांचे शक्तिप्रदर्शन बीबीदारफळ साठी अर्ज दाखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ या गटातून भारतीय जनता पार्टीच्या वतीने इंद्रजीत पवार यांनी मोठी मोटर सायकल रॅली काढून शक्ती प्रदर्शन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

मार्डी गावातून निघालेली मोटर सायकल रॅली छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, चार हुतात्मा स्मारक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून उत्तर तहसील कार्यालयात आली.

यावेळी माजी आमदार दिलीप माने, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश नेते शहाजी पवार, बाजार समितीचे



संचालक अविनाश मातंर्डे, ज्येष्ठ पत्रकार अरुण बारसकर, सुनील जाधव, माजी सभापती संध्याराणी पवार, विनायक सुतार, श्रीमंत बंडगर, तात्या मगर, कुमार भिंगारे, शाम शिंदे, बाबासाहेब पाटील, बाळासाहेब पाटील, शिवाजी सोनार यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला.

बी बी दारफळ गणातून सुनीता अरुण बारस्कर, मार्डी गणातून तेजस्विनी अमोल बोराडे यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. ज्येष्ठ पत्रकार अरुण बारसकर यांच्या पत्नीला पंचायत समितीच्या निवडणुकीत बीबी दारफळ गणातून भाजपने उमेदवारी दिली आहे.

# मुख्यमंत्र्यांनी दावोस मधून अनुभवला भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय सायकलिंग 'ग्रँड टूर'चा थरार

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आणि भारतीय क्रीडा विश्वात नवा इतिहास घडवणारी 'बजाज पुणे ग्रँड टूर' ही आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेला आज सुरूवात झाली. देशातील ही पहिलीच आंतराष्ट्रीय 'ग्रँड टूर' सायकल स्पर्धा असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथील आपल्या व्यस्त कार्यक्रमात वेळ काढून स्पर्धेचे थेट प्रक्षेपण पाहिले.

'बजाज पुणे ग्रँड टूर'ला जागतिक स्तरावर 'टूर डी फ्रान्स'सारख्या स्पर्धांना असलेली प्रतिष्ठा मिळली आहे. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दावोस येथील औद्योगिक परिषदेसाठी जाण्यापूर्वी शुभारंभ कार्यक्रमात जगभरातील सायकलपटूंचे स्वागत केले होते. दावोस येथे राज्याच्या औद्योगिक विकासासाठी विविध उद्योग संस्थांशी सामंजस्य करार करण्यात



व्यस्त असतांनाही त्यांनी महाराष्ट्र आणि पुण्याची आठवण ठेवली. राज्याच्या क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी महत्वाच्या असलेल्या या महत्वाच्या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी त्यांनी सोबत असलेल्या अधिकाऱ्यांच्या लॅपटॉपवर स्पर्धेतील थरार अनुभवला.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होत असतांना त्यांनी सायकलपटूंच्या कौशल्याचेही कौतुक केले. सायकलपटूंना पुण्यात मिळणारा प्रतिसाद, इथेले उत्सवाचे स्वरुप, सायकलपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आलेली तरुणाई पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. ही स्पर्धा राज्यातील क्रीडा क्षेत्राला प्रेरक ठरेल आणि सायकलचे शहर ही पुण्याची जुनी ओळख नव्या रुपात पुढे येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसाठी गेले आहेत. दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमात दोन्ही देशातील वेळांचा फरक लक्षात घेवून त्यांनी स्पर्धेच्यावेळी थेट प्रक्षेपण पाहण्याची इच्छा व्यक्त केल्यावर सोबत असलेल्या अधिकाऱ्यांनाही या गोष्टीचे कौतुक वाटले. मुख्यमंत्री सचिवालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू यांनी देखील थेट प्रक्षेपण पाहताना स्पर्धेचा आनंद घेतला.

एका बाजूला महाराष्ट्रात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्यासाठी विविध देशांतील उद्योगसमूहांसोबत सामंजस्य करार होत असताना, दुसऱ्या बाजूला राज्यातील क्रीडा क्षेत्रात घडणाऱ्या या ऐतिहासिक घडामोडीकडे दिलेले विशेष लक्ष क्रीडा क्षेत्राला निश्चितपणे प्रोत्साहन देणारे आहे. भारतामध्ये पहिल्यांदाच होत असलेल्या 'ग्रँड टूर' स्वरूपाच्या या स्पर्धेला जागतिक व्यासपीठावरून मिळालेली ही दाद क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे नियम, अत्याधुनिक आयोजन आणि विविध देशांतील नामवंत सायकलपटूंचा सहभाग यामुळे 'बजाज पुणे ग्रँड टूर'ने पुण्याला जागतिक सायकलिंगच्या नकाशावर ठळक स्थान मिळवून दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोससारख्या आंतरराष्ट्रीय मंचावरून या स्पर्धेचा थरार अनुभवणे, हे आयोजक, खेळाडू तसेच क्रीडाप्रेमींसाठी मोठे प्रोत्साहन ठरले असून, यामुळे महाराष्ट्रात क्रीडा संस्कृती अधिक बळकट होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे.

# आ. अभिजीत पाटील यांचे सीना-माढा योजनेतून पाणी सोडण्याचे आदेश

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** उजनी जलाशयातून सीना-माढा सिंचन योजनेद्वारे पाणी सोडण्याचे आदेश आमदार अभिजीत पाटील यांनी कार्यकारी अभियंता सुचित्रा डुंबरे यांना दिले आहेत. या योजनेतून पाणी सोडण्यास कोणतीही अडचण नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.


पावसाळा संपून तीन महिने उलटून गेल्याने सीना-माढा सिंचन योजनेच्या ४० हजार एकर लाभ क्षेत्रातील तलाव, विहिरी व बोरवेल्समधील पाणी मोठ्या प्रमाणात आटले आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, मका, बाजरी, कडधान्ये,




भुईमूग, चारा, वैरण, ऊस तसेच फळबागांना पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे.

याशिवाय या परिसरातील नागरिक व पशुधनासाठीही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे सीना-माढा सिंचन योजना तातडीने सुरू करून ४० हजार एकर क्षेत्रातील कोट्यवधी रुपयांच्या उभ्या पिकांचे नुकसान टाळणे आवश्यक आहे, असे आमदार अभिजीत पाटील यांनी यावेळी सांगितले.

# इंग्रजी ही देश विदेशातील माणसे जोडणारी भाषा - प्रा डॉ दीपक ननवरे



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** आधुनिक जगात प्रभावी आणि व्यापक संवादाची भाषा म्हणून इंग्रजी भाषा ओळखली जाते विविध देशांतील लोकांना एकमेकांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य इंग्रजी भाषेने केले आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा ही जागतिक एकात्मतेचे प्रतीक बनली आहे. असे प्रतिपादन दयानंद महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ दीपक ननवरे यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने आयोजित केलेल्या इंग्रजी भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ सुरेश ढेरे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रा डॉ अनिलकुमार वावरे, संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, प्रा डॉ विरभद्र दंडे, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

डॉ दंडे म्हणाले की, उच्च शिक्षण, संशोधन, स्पर्धा परीक्षा तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक असते. अनेक महत्त्वाची पुस्तके, संदर्भ साहित्य आणि संशोधन कार्य इंग्रजी भाषेत उपलब्ध असल्यामुळे ज्ञानसंपादन अधिक सुलभ होते. इंग्रजी भाषा शिकल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

प्राचार्य डॉ ढेरे म्हणाले की,करिअरच्या दृष्टीने बहुराष्ट्रीय कंपन्या, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र, माध्यमे, पर्यटन आणि सेवा क्षेत्रात इंग्रजी संवाद कौशल्याला मोठी मागणी आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभाग प्रमुख प्रा राजशेखर पवार यांनी केले, आभार समर्थ पवार यांनी मानले.

भित्तिपत्रकामध्ये संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन जगप्रसिद्ध इंग्रजी लेखकांचे कार्य संकेत पुजारी, रविराज कुलकर्णी, समर्थ पवार, पंचप्पा जाधव, पवन अंबुरे, आकाश कोकरे, शकुंतला कोरे, पायल कांबळे यांनी अधोरेखित केले.

### विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचे ज्ञान अवगत करावे

तंत्रज्ञान आणि डिजिटल युगात इंटरनेट, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच जगातील घडामोडी समजून घेण्यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत केली पाहिजे. असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# पुणे ग्रँड टूरच्या निमित्ताने शहराच्या भिंती झाल्या 'बोलक्या'

पुणे (कटूसत्य वृत्त):- पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात होत असलेल्या 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' या ऐतिहासिक सायकलिंग स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही महानगरातील भिंती अक्षरशः बोलू लागल्या आहेत. शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी आणि नागरिकांमध्ये खेळाप्रती उत्साह निर्माण करण्यासाठी महापालिकेच्यावतीने ठिकठिकाणी आकर्षक भित्तिचित्रे साकारण्यात आली आहेत. यामुळे रस्ते केवळ रहदारीचे मार्ग न राहता, ते आता एक मुक्त कलादालन वाटू लागले आहेत.

### जागतिक दर्जाच्या खेळाडूंची ओळख

या भित्तिचित्रांमध्ये केवळ सायकलिंगच नव्हे, तर विविध खेळांतील दिग्गज आणि उगवत्या ताऱ्यांचा गौरव करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने २०२० चा रोड वर्ल्ड चॅम्पियनचा असलेला इटलीचा एलिसा बालसामो याचे चित्र क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेत आहे. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणारे पहिले भारतीय रोड सायकलपटू अरविंद पवार यांचे चित्र आजच्या तरुणाईसाठी प्रेरक आहे. २०२५ च्या ट्रॅक आशिया कपमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या हर्षिता जाखड यांचे चित्र 'वुमन पॉवर'चा संदेश देणारे आहे. सायकलिंगच्या क्षेत्रात देशाचे



नाव उज्ज्वल करणाऱ्या अल्ट्रा-सायकलपटू कबीर यांच्या संघर्षाची गाथा भिंतीवर रेखाटली आहे.

### खेळ आणि संस्कृतीचा सुरेख संगम

केवळ खेळाडूच नव्हे, तर महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा आणि संस्कृतीचे दर्शनही या भिंतींवर घडते. एका बाजूला 'वारी' आणि पारंपारिक वेशभूषेतील स्त्री-पुरुषांची चित्रे आहेत, तर दुसऱ्या बाजूला बास्केटबॉल, वेटलिफ्टिंग, योग आणि टेनिस खेळणाऱ्या महिलांची चित्रे 'Women of Pune' या संकल्पनेखाली साकारण्यात आली आहेत. 'भारतातील पहिली जागतिक सायकलिंग स्पर्धा' असा उल्लेख असलेली ही चित्रे पुण्याला जागतिक क्रीडा नकाशावर नेण्यासाठी सज्ज झाली आहेत.

### प्रशासनाचा पुढाकार आणि नागरिकांचा प्रतिसाद

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका माध्यमातून शहराच्या सौंदर्यीकरणाचा हा प्रकल्प राबवण्यात आला आहे. सिमेंटच्या निर्जीव भिंतींवरील रंग, कला आणि संस्कृतीचा हा सुंदर संगम पाहून नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. सायकल चालवणाऱ्या आणि व्यायाम करणाऱ्या नागरिकांसाठी यामुळे उत्साहवर्धक वातावरण तयार झाले आहे.

"शहरातील भिंतींवर आपले खेळाडू आणि आपली संस्कृती पाहताना अभिमान वाटतो. यामुळे केवळ शहराचे रूपच पालटले नाही, तर खेळाबद्दलची जागृतीही वाढली आहे," अशी प्रतिक्रिया एका स्थानिक नागरिकाने दिली. 'बजाज पुणे ग्रँड टूर' च्या निमित्ताने झालेला हा कलेचा आविष्कार पुणेकरांसाठी एक मोठी पर्वणी ठरत असून या कलेच्या माध्यमातून पिंपरी चिंचवडमध्ये क्रीडा उत्सवासाठी योग्य वातावरण निर्मिती झाली आहे..

# महिला शेतकऱ्यांसाठी २३ जानेवारी रोजी मुंबईत चर्चासत्र

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र सरकारचा कृषी विभाग आणि एमएस स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने महिला शेतक-यांच्या विविध विषयाच्या अनुषंगाने २३ जानेवारी २०२६ रोजी मुंबईत चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्य मंत्री अॅड आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह येथे हॉल क्रमांक ४ येथे सकाळी १० वाजता होणार आहे.

कृषी विभागाने आणि एमएस स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) यांच्यात आणि महिला सक्षमीकरण, संसाधन हक्क, पोषण सुरक्षा, लिंग न्याय, पर्यावरणीय शाश्वतता शेतकरी समृद्धी मजबूत करण्यासाठी मदत करणारे व्यापक धोरण तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणी कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी संयुक्तपणे सामंजस्य करार केला आहे. या करारातंर्गत शेतकरी महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांतर्गत या विविध विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राला कृषि विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, एमएस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौम्या स्वामीनाथन, कुमारीबाई, व्दारकाताई, सल्लागार समितीचे डॉ.गोविंद केळकर, सीमा कुलकर्णी, एमएस स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक डॉ. आर. रेंगलक्ष्मी, मीरा सौदरराजन यांची व्याख्याने होणार आहेत. हे चर्चासत्र सकाळी १० ते २ या वेळेत होणार आहे.